प्रेस नोट

दिनांक ०२/०८/२०१८

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. जितेंद्र रामचंद्र कांबळे, वय. ४४ वर्षे ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय खेर्डी ता. चिपळुण जि. रत्नागिरी, रा. अे-१०३ देसाई आर्किड पागमाळा, ता. चिपळुण जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | चिपळुण ते कराड जाणारे रस्त्याशेजारील ग्रामपंचायत खेर्डी येथील कार्यालयात ता. चिपळुण जि. रत्नागिरी |
| मगितलेली लाचेची रक्कम | ८,०००/- रुपये |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचा खडी, मंकीग, जळाऊ, सप्लाय करण्याचा व्यवसाय आहे. तक्रारदार यांनी माहे जुन २०१८ मध्ये खेर्डी ग्रामपंचायतीला मर्कींग,ग्रीट व जळावु लाकुड पुरविले होते. त्यांची बीले त्यांना चेकद्वारे मिळालेली आहेत. चेक मिळाले तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे पुरविलेल्या मालाचे बीलाचे दोन टक्के प्रमाणे लाच स्वरुपात कमिशनचे पैसे मागितले होते. परंतु तक्रारदार यांनी त्यांना रक्कम दिली नाही.<br>तक्रारदार यांनी दिनांक १९/०७/२०१८ रोजी खेर्डी ग्रामपंचायत कार्यालयात जावुन लोकसेवक श्री. कांबळे यांचेकडे माहीती अधिकारात दिलेल्या अर्जाची चौकशी केली. त्यावेळी लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी खेर्डी ग्रामपंचायतीला पुरवठा केलेल्या कामाचे बीलाचे कमिशन म्हणुन ८,०००/-रुपये आणुन दे मी तुला दोन दिवसात अर्जाची माहीती देतो असे सांगुन लाचेची मागणी करत असलेबाबत लोकसेवकाविरुध्द दिनांक ०२/०८/२०१८ रोजी तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीची दिनांक ०२/०८/२०१८ रोजी पडताळणी केली असता, त्यांचेत कामासंबंधी बोलणे झाले त्यावेळी लोकसेवक श्री. जितेंद्र कांबळे यांनी खेर्डी ग्रामपंचायतीला पुरवठा केलेल्या कामाचे बीलाचे कमिशन म्हणुन ८,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेले आहे.<br>पडताळणीनुसार लागलीच सापळा आयोजित केला असता, लोकसेवक जितेंद्र कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे खेर्डी ग्रामपंचायतीला पुरवठा केलेल्या कामाचे बीलाचे कमिशन म्हणुन ७,०००/- रुपये लाचेची रक्कम १३.४६ वाजता चिपळुण ते कराड जाणारे रस्त्याशेजारील ग्रामपंचायत खेर्डी येथील कार्यालयात स्विकारताना त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

2/8/18

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी